# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १६२ वा ❑ मंगळवार दि.१२ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## शरद पवारांचा नवीन राजकीय बॉम्ब

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी मतांची चोरी झाल्याचा गंभीर आरोप करत खळबळ निर्माण करून दिली असताना आता शरद पवार यांनी निखिल नवीन राजकीय बॉम्ब टाकून खळबळजनक गौप्यस्फोट केला आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नागपूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी शरद पवार यांनी मोठा गौप्यस्फोट केला. विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन लोकांनी भेट घेतली होती त्यांनी १६० जागा जिंकवण्याची गॅरंटी दिली होती. निवडणूक आयोगाबाबत शंका नसल्यानं त्याकडे दुर्लक्ष केलं, असं शरद पवार म्हणाले. त्या दोन लोकांची भेट राहुल गांधी यांच्यासोबत देखील घालून दिली होती. आम्ही दोघांनी जनतेत जाऊन जो कौल मिळेल तो स्वीकारण्याचं ठरवलं त्या माणसांकडे दुर्लक्ष करण्याचा निर्णय घेतला, असं शरद पवार म्हणाले.

शरद पवार यांच्या गौप्य स्फोट देखील अतिशय गंभीर आहे. मात्र शरद पवारांच्या या गौप्यस्फोटाने अनेक प्रश्न निर्माण केले. शरद पवारांना भेटलेले ते दोन कोण?,हे मात्र स्पष्ट केले नाही.. निवडणूक जिंकून देण्याची ग्वाही देणारे ते दोन व्यक्ती व निवडणूक आयोग यांचं साठलोट आहे का? राज्य विधानसभेच्या निवडणुका होऊन आता वर्ष होत आले आहे. इतके दिवस शरद पवार गप्प का होते? निवडणूक निकाल हायजॅक करणाऱ्या त्या दोन चोरट्यांना शरद पवारांनी पोलिसांच्या हाती का दिले नाही? निवडणूक प्रकारातील हायजॅकची

गोष्ट शरद पवारने राहुल गांधींनाच का सांगितली? ही बाब निवडणूक आयोगाच्या लक्षात का आणून दिली नाही? निवडणुकांच्या आधी निवडणुका जिंकून देण्याची गोष्ट करणे ही बाब लोकशाहीसाठी किती गंभीर आहे? ही बाब शरद पवार सारख्या मुरब्बी राजकारणी व्यक्तीला का समजली नाही?

खरं तर हा प्रश्न लोकशाहीच्या अस्तित्वाचा आहे. सामान्य लोकांच्या मताचा प्रश्न आहे. निवडणूक निकाला आधीच जर लोकांचं मत व्यक्त होत असेल तर अशा लोकशाहीला पारदर्शक लोकशाही म्हणायची काय? असे कितीतरी प्रश्न या अनुषंगाने निर्माण होतात.

लोकशाहीवर विश्वास असल्याने शरद पवार व राहुल गांधी त्या व्यक्तींच्या वक्तव्यांकडे दुर्लक्ष केल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. लोकशाहीवर श्रद्धा आणि विश्वास असणाऱ्या शरद पवारांनी लोकशाहीला आव्हान देणाऱ्या त्या दोन व्यक्तींना तेव्हाच पोलिसांच्या हवाली करायला हवे होते..निवडणूक आयोगाकडे त्यांची तक्रार करायला पाहिजे होती.मात्र शरद पवार यांनी हा प्रश्न राहुल गांधीन पुरताच सिमित का ठेवला?..

## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.

# नेते, अधिकारी व धर्मगुरूंनी अवयव दान जागृतीसाठी पुढाकार घ्यावा- आय एम ए अध्यक्ष डॉ अनुपम टाकळकर

### अवयवदान ही काळाची गरज डॉ श्रीगणेश बर्नेला यांचे आवाहन; आय एम ए छत्रपती संभाजीनगर चे मॉडेल भारतातील इतर संस्थांनी अडॉप्ट करावे- डॉ गुणाधार पढी



ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर शाखा ही केवळ वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिक संघटना न राहता समाजहिताचे विविध उपक्रम राबवणारी संस्था म्हणून ओळखली जाते. समाजाच्या आरोग्यविषयक जाणीवा वाढविणे, रुग्ण–नातेवाईकांमध्ये विश्वास निर्माण करणे आणि वैद्यकीय क्षेत्राची प्रतिष्ठा वृद्धिंगत करणे या उद्दिष्टांसाठी आयएमए सातत्याने प्रयत्नशील आहे. गेल्या तीन महिन्यांत आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेने अवयवदानाबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती कार्यक्रम हाती घेतले आहेत. या मोहिमेला संघटित व परिणामकारक स्वरूप देण्यासाठी अवयवदान जनजागृती समिती स्थापन करण्यात आली असून, तिचे चेअरमन डॉ. श्रीगणेश बर्नेला आहेत.

याच मोहिमेचा पुढचा टप्पा म्हणून दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी ‘‘ब्रेन डेथ आणि अवयवदान– आयसीयू, न्यूरॉलॉजी व ट्रान्सप्लांटचे विविध पैलू’’ या विषयावर शहरातील अवयवदान प्रक्रियेशी निगडित डॉक्टरांसाठी एक विशेष कंटिन्यूइंग मेडिकल एज्युकेशन () आयोजित करण्यात आले. या कार्यशाळेचे समन्वयन डॉ. श्रीगणेश बर्नेला यांनी आणि संयोजन सचिव डॉ योगेश लक्कास यांनी केले.

सूत्रसंचालन डॉ सोनाली सावजी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ अर्चना भांडेकर यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वरिष्ठ फिजिशियन डॉ. पुरुषोत्तम दरक यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘‘पूर्वी रक्तदानासाठी देणगीदार मिळणे अवघड होते, पण सातत्यपूर्ण जनजागृतीमुळे समाजात बदल घडला. आज अवयवदान जनजागृती ही तातडीची गरज आहे. रुग्णांच्या नातेवाईकांकडून होणाऱ्या हल्ल्यांपासून बचावासाठी आणि समाजात आपली प्रतिष्ठा टिकवण्यासाठी डॉक्टरांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.आयएमए छत्रपती संभाजीनगर या दिशेने उत्कृष्ट काम करत आहे.’’

मुख्य अतिथी डॉ. गुणाधार पढी, मुख्य अतिदक्षता तज्ञ, सर एच. एन. रिलायन्स हॉस्पिटल, मुंबई, यांनी कौतुकपूर्वक सांगितले की, ‘‘आयएमए छत्रपती संभाजीनगरने राबवलेला अवयवदानाचा मॉडेल संपूर्ण देशासाठी आदर्श आहे. हा उपक्रम देशभरातील संस्थांनी आत्मसात करणे गरजेचे आहे.’’ आयएमए अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, अवयवदान ही काळाची गरज आहे. आपल्या समाजातील नेते, सरकारी अधिकारी आणि विविध क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तींनी या विषयासाठी पुढाकार घ्यावा. दररोजच्या बैठकीत, भाषणांत किमान एक–दोन मिनिटे अवयवदानाविषयी जनजागृतीसाठी द्यावीत. प्रत्येक व्यासपीठावर हा संदेश पोहोचवणे गरजेचे आहे. विशेषतः धार्मिक आणि समाजनेत्यांनी आपल्या समुदायाला सांगावे की, अवयवदान हे एक ‘महादान ’ आहे आणि हे कार्य ‘पुण्याचे काम’ आहे. या संदेशामुळे समाजात सकारात्मक बदल घडेल आणि अनेक जीव वाचतील वैज्ञानिक सत्रांमध्ये विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन झाले डॉ. योगेश लक्कस सचिव यांनी ‘‘भारतामधील अवयवदान – जनजागृती व सहभाग वाढवण्या साठीच्या रणनीती’’ या विषयावर भारतातील सद्यस्थिती, अडचणी आणि उपाययोजना मांडल्या.

डॉ. अब्दुल माजिद, वरिष्ठ न्यूरॉलॉजिस्ट, अॅपेक्स हॉस्पिटल, यांनी ‘‘ब्रेन स्टेम डेथची ओळख व प्रमाणपत्र प्रक्रिया’’ सविस्तर समजावून सांगितली. त्यांनी वैद्यकीय निकष, चाचण्या व कायदेशीर बाबींवर भर दिला.

डॉ. गुणाधार पढी यांनी ‘‘ब्रेन डेथ रुग्णांचे आयसीयु प्रोटोकॉल व नैतिक आचारसंहिता’’ यावर भाष्य करताना, अवयवदानासाठी रुग्णांची शारीरिक स्थिती योग्य राखणे आणि कुटुंबियांसोबत प्रामाणिक संवाद साधण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

डॉ. श्रीगणेश बर्नला यांनी ‘‘मृत अवयव प्रत्यारोपण प्रक्रिया व कायदेशीर चौकट’’ यावर मार्गदर्शन केले. त्यांनी परवानगी प्रक्रिया, नोंदणी, शासकीय यंत्रणांसोबतचे समन्वय आणि प्रत्यारोपणाची टप्प्याटप्प्याने होणारी अंमलबजावणी स्पष्ट केली.

हा कार्यक्रम केवळ वैद्यकीय ज्ञानवृद्धीपुरता मर्यादित न राहता, अवयवदान चळवळीला वैचारिक व नैतिक अधिष्ठान देणारा ठरला. आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेचे हे पुढाकार सामाजिक बांधिलकी, वैद्यकीय जबाबदारी आणि नैतिक मूल्ये यांचे सुंदर मिश्रण असल्याचे सर्व उपस्थितांनी मान्य केले.






## वास्तुशास्त्र पेंटिंग



लघुलेख - 15

आपण 'वास्तुशास्त्र पेटींग'च्या सुमारे १४ लघुलेखांचे वाचन केले असेल तर आपल्या ध्यानात यायला मदत होईल की 'वास्तुशास्त्र पेंटींग' हा दृश्यकला प्रकार हा सामान्य नसून, तो एका ठराविक शास्त्राचा- उपचारांचा आणि सदर वास्तुशी संबंध जोडण्याचा' विधी आहे.

कुठलिही कला ही अनेक रियाज़ांतून साध्य व्हायला मदत होते. ६४ कला प्रकारांमध्ये 'चित्रकला' आणि 'शिल्प कला' किंवा 'मूर्तीकला' ही प्रत्येकाला इच्छेनुसार जवळ बाळगता येते. संग्रही ठेवता येते. आज आधुनिकतेच्या आणि माहिती - तंत्रज्ञानाच्या युगात AI' अर्थात "आर्टिफिशियल इंटेलिजन्स" नावाच्या म्हणजे "कृत्रिम बुद्धिमत्ता' नावाच्या अपत्याने जन्म घेतला आहे. या तंत्राला काहीही माहिती मागवली की, कांही सेकंदात उपलब्ध होते मात्र....

मी अगदी ठाम विश्वास पूर्वकतेने सांगेन की, 'वास्तुशास्त्र पेंटिंग' हे 'तंत्रज्ञान नसल्यामुळे आणि एक विशिष्ट 'सृजन' असल्यामुळे साधनेतून निर्माण झालेले असल्यामुळे 'AI' या दृश्य कला प्रकाराजवळ पोहोचू शकेल असे वाटत नाही. हा दृश्यकला प्रकार कायम 'NI'च राहील, म्हणजे "नॅचरल इंटेलिजन्स' किंवा 'नैसर्गिक बुध्दिमत्ता'च असेल आणि म्हणूनच 'ज्योतिर्मय'च्या वाचकांना खात्रीपूर्वक सांगावेसे वाटते की, 'वास्तुशास्त्र पेटींग' हा दृश्यकला प्रकार केवळ आणि केवळ एकमेव आहे.

हे पेटींग, कुणी त्याची नक्कल करून स्वतः कडे गृह सजावटीतील एक भाग म्हणून लावले तर ते त्या सजावटीचा एक भाग जरूर बनेल परंतु त्या पासून मूळ मालकाला जे लाभ होतात, ते इतरांना होणार नाहीत. कारण अनोळखी जागी जर आपण जाउन पडलो तर आपला जो एक गोंधळ उडतो, तीच आवस्था "त्या- नक्कल केलेल्या पेंटींग'ची होते आणि ती नक्कलच असल्यामुळे त्या पेटींगचा प्रभाव दिसत नाही.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......


काय सांगू बाई
माया बंधूची चालनी
अन दुकान सोडून
पाहू लागल्या वाणीणी ॥२०१॥

तुझा माझा गळा
येतो दुधड दुधड
गवळणी बाई
पेटी गाण्याची उघड ॥ २०२॥

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# निसर्गायन - प्राणिजगत

## (माझ्या ‘‘रंगसोहळा’’ या पुस्तकातून )




ज्योतिर्मय साहित्य

प्रख्यात वन्यजीव अभ्यासक, ज्यांनी जंगलातच आपले सारे आयुष्य घालवले आणि जंगलांची आणि प्राण्यांची अनेक रहस्ये ज्यांना त्यामुळे हस्तगत झाली असे मारुती चितमपल्ल्ली यांनी आपल्या एका पुस्तकात वाघाविषयी एक विलक्षण लोककथा सांगितली आहे. चंद्रपूर-मूल रस्त्यावर एक फकीर एनाक्षीमिया आणि एका वाघिणीची कबर आहे. ही बरीच प्राचीन कथा आहे. पण ही कबर आजही अस्तित्वात आहे. त्या चंद्रपूरजवळच्या जंगलात एनाक्षीमिया नावाचा एक फकीर राहत होता. त्या जंगलात राहणारी एक वाघीण रोज रात्री एनाक्षीमियाजवळ येऊन बसत असे. तो फकीर धुनी पेटवायचा. त्या धुनीजवळ ती वाघीण येऊन बसत असे. दोघांनाही एकमेकांचा सहवास प्रिय झाला होता. एकदा पावसाळ्याचे दिवस होते. त्या भागातला एक आदिवासी जो जंगलात फिरत होता, तो पावसात भिजला. अंधार पडायला लागला, त्याला तहान, भूक लागली होती. तशात त्याला एनाक्षीमियाची झोपडी आणि पेटलेली धुनी दिसली. ती बघून मोठ्या आशेने तो तिथे आला.




आता त्या माणसाला अवेळी आलेला पाहून एनाक्षीमिया संकटात सापडले कारण आता वाघीण यायची वेळ झाली होती. तो अनोळखी माणूस पाहून वाघिणीने त्याला फाडून खाल्ले असते. बरं त्याला परत जा असे सांगणेही धोक्याचे होते कारण रस्त्यात वाघिणीने त्याच्यावर हल्ला करण्याची शक्यता होती. मियांवर हे धर्मसंकट होते. त्यांनी एक युक्ती केली. त्याचे कपडे त्यांनी स्वतः परिधान केले. आपली कफनी त्याला दिली. त्याच्या अंगाला राख फासली. आणि त्याला तिथे सुरक्षित बसवून मिया वाघाणीच्या दिशेने निघाले. रस्त्यात त्या वाघिणीची आणि त्यांची गाठ पडली.

पण वाघिणीने त्यांना वेष बदलला असल्याने सुरुवातीला ओळखले नाही आणि त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात एनाक्षीमिया गतप्राण झाले. त्या वाघिणीच्या लक्षात जेव्हा ही गोष्ट आली, तेव्हा तिला प्रचंड धक्का बसला. आपल्या प्रिय व्यक्तीचा मृत्यू आपल्या हातून झाला हे तिच्या लक्षात आले. तिने दुःखाने एक मोठी डरकाळी फोडली. आणि आपली शेपूट आपटून त्याच जागेवर तिने प्राण सोडले. हा आदिवासी जो तिथे थांबला होता, तो तिथे आला. त्याच्या लक्षात ही सगळी गोष्ट आली. तो गावात गेला आणि सगळ्या गावकऱ्यांच्या कानावर ही घटना घातली. गावकऱ्यांनी नंतर एनाक्षीमिया आणि ती वाघीण यांची कबर बांधली.

वाघ हा हिंस्त्र प्राणी जरी असला, तरी आदिवासींना त्याच्याबद्दल आदर आहे. वाघांमुळे जंगलाचे रक्षण होते, आणि जंगलांमुळे वाघ अस्तित्वात आहेत ही गोष्ट त्यांना माहिती आहे. त्यामुळे आजही एखादा वाघ मेलेला दिसला तर आदिवासी त्याला नमस्कार करतात. पाय लावत नाहीत.

**(क्रमशः)**







उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# बहुधाज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

इंद्रियांना दिसणारे जग हे द्रुष्य स्थूल ऊदा, पर्वत, समुद्र, झाडे, जनावरे, माणसे, घरे, बंगले देऊळे जे जे आपल्या डोळ्यासमोर दिसतात ते सर्व द्रुष्यस्थूलात येतात. इंद्रियांना न दिसणारे पण मनाला व बुध्दीला आकलन होणारे जग हे अद्रुष्य स्थूल होय. ऊदा. निसर्गाचे नियम, वस्तुंचे अंतरंग, ध्येये, मुल्ये, अर्थ, परमाणु, वासना, भावना, विचार असे कितीतरी उदा. देता येथील. द्रुष्य व अद्रुष्य स्थूलाचा अभ्यास करून माणूस जे आत्मज्ञान मिळवतो त्यालाच विज्ञान, सायन्स असे म्हणतात. देहबुद्धीच्या ज्ञानाची कक्षा अद्रुष्य स्थूलापर्यन्त पोहचते. सामान्यतः हे परिपूर्ण ज्ञान आहे असे आपल्या सारख्या सर्वसामान्यांना वाटते. पण समर्थाच्या मते ते ज्ञान नाही. जीवाला स्वस्वरूपाच्या ज्ञानाची तळमळ असते. ती आत्मज्ञांनावाचूंन शांत होत नाही. जोपर्यंत सरळ ,स्वच्छ व निर्मळ आत्मज्ञान होत नाही तोवर इतर सर्व निरर्थक होते. माणसाच्या ह्रदयात आत्मा वास करतो. जसे अन्नावांचून देह जगत नाही तसे ज्ञानावाचून मानवी जीवन व्यर्थ होय. माणसाला अगदी मनापासून ज्ञान हवे असते. मानवीजीवनाची ज्ञाताही प्रथम पायरी आहे असे म्हणले तर ते चुकीचे होणार नाही. जसे अर्भक अवस्थेतील मुल सुद्धा जिज्ञासेने आजूबाजूला बघते. ही ज्ञानजिज्ञासेची त्याची पहिली ओळख आहे. बालकाच्या टुकुटुकु बघण्याची क्रिया ही मातेला अतिशय आनंद देण्याची क्रिया असते. त्याचप्रमाणे ज्ञाता, कर्ता,भोक्ता यातीन स्थित्यंतराच्या अवस्था आहेत. ज्ञानाचे प्रधान साधन बुद्धी आहे. ज्ञानाचे स्वरूप, मार्ग,कक्षा व भांडार हे सर्व माणसाच्या बुद्धीवर अवलंबून आहे. बुद्धीत फरक पडला तर ज्ञानात आपोआप फरक पडतो. जन्माला आलेल्या बालकाला ज्याप्रमाणे बुद्धीच्या आकलनशक्तीच्या जोरावर मोठे होते हे जसे खरं आहे तसेच ते वयात आल्यावर त्याच्या शररीरांत,मनात, व बुद्धीत सर्व बाजूंनी बदल होतो. त्याचप्रमाणे त्याच्या ज्ञानामध्ये सुद्धा प्रचंड बदल होतो. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नामधारकाने टाळण्याच्या गोष्टी

ज्योतिर्मय साहित्य

आपले विचार स्वार्थाचे नसावेत. स्वार्थामध्ये अभिमान नेहमी जागृत असतो. स्वार्थी मनुष्याला जगात सुख मिळणे कधीही शक्य नाही. नीतीची बंधने पाळा. परस्त्री मातेसमान माना. प्रपंचात एकपत्नीव्रताने राहणारे गृहस्थ लोक ब्रह्मचारीच होत. परद्रव्याची अभिलाषा धरू नका. त्याला विष्ठेसमान माना. दुसऱ्याच्या पैक्याचा अभिलाष धरण्यात आपला किती घात आहे याची नुसती कल्पनाच केलेली बरी. परस्त्री, परद्रव्य, यांच्याप्रमाणेच परनिंदा हीही अत्यंत त्याज्य आहे. परनिंदेने न कळत आपण आपलाच घात करीत असतो. परनिंदेमध्ये दुसऱ्यांच्या दोषांचे चिंतन होत असल्या कारणाने, ते दोष आपल्याकडे येत असतात. या सर्व गोष्टी सांभाळून तुम्ही नाम घ्या, नामाचे प्रेम तुम्हाला अगदी खात्रीने येईल. हे सर्व करीत असताना तुमचे आईवडील, बायकोमुले, यांच्या बाबतीत असलेले कर्तव्य करायला चुकू नका आणि त्या कर्तव्यात आसक्ती राहू देऊ नका. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता केलेले कर्म हे कर्तव्यच होय. ते कर्तव्य सांभाळून नीतिधर्माने वागून आपला प्रपंच करा, आणि भगवंताचे स्मरण ठेवा. मग तुमचा प्रपंचच परमार्थरूप बनून भगवंताचे प्रेम तुम्हाला मिळेल हा माझा भरवसा तुम्ही बाळगा.

प्रपंच हा मिठासारखा आहे. भाकरीत मीठ किती घालायचे असते ? तर अगदी थोडे-फक्त चवीपुरते ! परंतु आपण मिठाची भाकरी करतो आणि त्यात परमार्थाचे चिमूटभर पीठ टाकतो; मग ती भाकरी खाता येईल का ? खरे समाधान मिळाल्यावर मनुष्य खेळासारखा प्रपंच करतो. त्यामध्ये तो वर चढला किंवा खाली पडला तरी सारखाच राहील; दुसऱ्याने डाव टाकल्यावर तो आपणही डाव टाकील ! पण डाव हरला किंवा जिंकला तरी त्याची त्याला पर्वा राहणार नाही. प्रपंचात अनेक वस्तू आहेत, पण भगवंताजवळ एकच वस्तू आहे. प्रपंचात कितीही वस्तू आणल्या तरी त्या पुऱ्या पडत नाहीत, कारण एका वस्तूच्या आणण्यामध्येच दुसऱ्या वस्तूच्या आणण्याचे बीज आहे. पण भगवंताचे तसे नाही; भगवंताची वस्तू एकदा आणली की पुन्हा ती आणायला नको. समजा, एका दुकानात पुष्कळ माल भरलेला आहे; पण आपल्याला पाहिजे ती वस्तू तिथे नाही, म्हणजे आपल्या दृष्टीने तिथे काहीच नाही ! त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या मानसिक शक्ती असून तिथे भगवंत नसेल, तर त्या असून नसून सारख्याच समजाव्यात. परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावा. यातच जन्माचे सार्थक आहे. परमार्थात अहंकार मिसळला की तो प्रपंचच झाला. प्रपंचातला अहंकार दूर झाला की तो परमार्थच.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचा अभंग (भाग एक)

ज्योतिर्मय साहित्य

मूढ व्यक्ती : या गटातील व्यक्ती ह्या मूर्ख, बुद्धीत जडत्व असणाऱ्या असतात. या मंडळी हळूहळू हालचाल करणारी, खूप निद्रा घेणारी असतात. यांना तंद्री लागते. यांना मोह फार असतो. चर्वन, तर्पण प्रयोग यांना जमत नाही. अशी माणसे मोह ग्रस्त असतात. विषय, वस्तू, व्यक्ती यामध्ये आसक्ती असते. हे आळशी हीन दीन असतात. ठीक ढंगाने योग्य विचार करत नाहीत. यांना योग्य वेळी योग्यते सुचत नाही. नंतर शहाणपण सुचते. यांच्या बुद्धीवर जडत्व असते. बुद्धीवर झापड असते. काम, क्रोध, मद, मत्सर यांना जास्त असतो. विपरीत व अनुचित कामात ही मंडळी व्यग्र असतात. या व्यक्ती फालतू गोष्टीसाठी वेळ काढतात. नैतिक मर्यादा, अनुशासन हे मोडतात. ही मंडळी कटू बोलतात. जन प्रवाहाबरोबर ही नसतात. हे समाजाला बदलवू शकत नाहीत. हे दारू पिणारे असु शकतात. म्हणून आपणही प्या असे ते इतरांना पिण्याविषयी समर्थन देतात.

विक्षीप्त व्यक्ती : या गटातील व्यक्तींच्या ठाई

योग्यता, तत्परता असते. यांच्याजवळ संपन्नता असते, पण चिक्कू पण असतात. अशी माणसे भित्री असतात. दुर्गुण व सद्गुणांचा यांचे ठाई संगम असतो. हे साहसी उदार म्हणूनही प्रसिद्ध होतात. तरीही हे लोक भीत्री सुद्धा असतात. अशा व्यक्ती नेहमी टेन्शन घेऊन राहतात. ही मंडळी दैवी संपदा मिळवू शकत नाहीत. यांना आत्म संतोष मिळत नाही. यांना लोक सन्मान मिळत नाही. यांचे व्यक्तिमत्त्व अविकसित राहते. ही माणसे स्वतःचे ओझे स्वतः उचलतात. दुसऱ्यांचे नाही.

एकाग्र व्यक्ती : या गटातील व्यक्ती संपन्न प्रतिभाशाली असतात. यांचे जवळ एका वेळेस एक काम एक विचार असतो. हे दुःखातही सुख मानतात. यांचे चिंतन चारित्र्य व व्यवहार उत्कृष्ट असतो. यांच्या उक्ती व कृती यात समानता असते. ही मंडळी त्यांच्याकडून इतर लोकांनाही फायदे देतात. या व्यक्ती विचारशील, विवेकशील असतात. यांना मोह नसतो. हे उत्तम प्रशासन करतात. हे कलाकार ,बुद्धिजीवी असतात. हे वैज्ञानिक असतात. हे साधू असतात. प्रतिकूल परिस्थितीत ही मंडळी हसून जगतात. जगाला सुसंस्कारितता सुसंपन्नता यांच्यामुळे आलेली असते.

निरुद्ध अवस्था : या गटातील व्यक्ती या अतिशय दुर्मिळ पणाने आढळणाऱ्या असतात. ही मंडळी चेतनेची अंतिम स्थिती असतात. हे सिद्ध पुरुष असतात. हे समाधीस्थ असतात. यांना सुपर माईंड असते. हे सिद्धीचे भांडार असतात. ही मंडळी देव मानव असतात. हे ज्ञानेश्वर तुकाराम गोरोबाकाका एकनाथ गाडगे बाबा असतात. हे इंद्रिय संयमी असतात. साधन संयम, वैचारिक संयम, यांचे जवळ असतो. यांच्या आवश्यकता सीमित असतात.

आवश्यकता कमी करणे म्हणजे त्याग

हे महामानव समाजाचे पुनर्निर्माण करतात. लोक कल्याण यांचे ब्रीद असते. हे दैवी अनुदानाचा जनतेवर वर्षाव करतात. लोक कल्याणाची कामे करतात. यांना लोक सन्मान देतात. यांचे कडे लोक आकर्षित होतात. हे विश्वाचा कायाकल्प करतात.

प्रस्तुत अभंगात तुकाराम महाराज म्हणतात आपण क्षिप्त विक्षीप्त व मूढ हे तीन प्रकार त्यागून यापेक्षा एकाग्र व निरुद्ध या अवस्थेकडे गेले पाहिजे.

मनात ताण चिंता टेन्शन असेल तर मनाचे तुकडे होतात. जर एकाग्रता व निरुद्ध स्थिती यायची असेल तर मनाचे केंद्रीकरण व्हावयास हवे. सध्या ९०% लोक क्षिप्त, विक्षिप्त व मूढ या प्रकारातच असतात.

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

२२. आवाहन

अंबे घराकडे यावे। मला कडेवर घ्यावे।
परत ना कधी जावे। मनी माझ्या स्थिर व्हावे।।
तुझे नाम मी घ्यावे। चरित्र ते उच्चारावे।
अंतरी ध्यास लागावे। चिंतनी तू असावे।।
ओढओढे ओढावे। मज जवळी तू घ्यावे।
तनुमने वाचे भावे। मी तुजसी भजावे।।
आर्त्त माझे तू ऐकावे। मज मार्गही दावावे।
मी ऐसे मनी आणावे। प्रकट माये तू व्हावे।।
किती जन्म म्या घ्यावे। याचि जन्मी तू यावे।
मी नामरूप होआवे। मागे काही ना उरावे।।




# स्वस्त पण बहुगुणी तुरटी

ज्योतिर्मय साहित्य

तुरटीची ओळख आपल्याला लहानपणी शाळेच्या पुस्तकातून झालेली असते किंवा आपल्या घरातील पुरुष मंडळींना बऱ्याचदा दाढी केल्यानंतर अँटी सेपटीक म्हणून तिला गालावरून फिरविताना पाहिलेले असते. तर कधी पावसाळ्यात गढूळ झालेले पाणी शुद्ध करण्यासाठी तुरटी त्या पाण्यात फिरविली जाते. इतकीच आपल्याला तुरटी विषयी माहिती असते. पण वरवर लहान दिसणारी ही चीज पार डोक्यापासून ते पायाच्या नखापर्यंत प्रत्येक बाबतीत उपयोगी आहे हे तुम्हाला माहित आहे का?

तर पाहूया तुरटीचे ६ महत्त्वाचे फायदे

१. केसांच्या समस्येवर उपयुक्त

आजकाल तरुण वयातच पांढऱ्या केसांच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. अशावेळी तुरटीची बारीक पूड करून, तुम्ही केसांना लावत असलेल्या तेलामध्ये ते थोडेसे कोमट करून, त्यात मिसळावी. अर्धा तासांनी ही पूड त्या तेलामध्ये चांगलीच विरघळलेली दिसेल. मग या तेलाने डोक्याला मसाज करावा. नंतर नेहमीप्रमाणे केस धुऊन टाकावे. महिन्यातून २-३ वेळा हा उपचार केल्यास हळूहळू पांढऱ्या केसांची समस्या कमी झालेली दिसेल. तसेच बऱ्याचदा शाळेत जाणाऱ्या मुलींमध्ये डोक्यात उवा निर्माण होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते. अशावेळी हे तुरटी मिश्रित तेल लावल्याने उवांचा नायनाट होतो आणि सतत डोक्याला खाज निर्माण होण्याच्या समस्येपासून सुटकारा मिळतो.

२. तोंड व दातांवरील समस्येवर रामबाण औषध

एक ग्लास गरम पाण्यात चिमूटभर मीठ व एक लहानसा चमचा तुरटी पावडर घालून मिक्स करावे. हे पाणी गार झाल्यावर या पाण्याने गुळण्या केल्यास दातावरील किड कमी होते. शिवाय तोंडाला एक प्रकारची दुर्गंधी येत असल्यास ती हळूहळू नाहीशी होऊन तोंडाचे आरोग्य सुधारण्यास मदत होते.

३. ताप, खोकला व दमा सारख्या रोगांवर

वातावरणातील बदलामुळे ताप, खोकला, दमा यासारख्या समस्या डोके वर काढू लागल्या आहेत. या समस्यांच्या सुरुवातीच्या काळातच रात्री झोपताना एक ग्लास दुधामध्ये १० ग्रॅम खडी साखर व २ चिमूट तुरटीची पूड एकत्र करून घ्यावी. यामुळे चांगलाच आराम पडतो.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

४. आखडलेल्या मांसपेशीवर उपयुक्त

बऱ्याच जणांना मांसपेशी आखडण्याची समस्या भेडसावीत असते. अशावेळी तुरटी आणि हळदीची पूड एकत्र करून आखडलेल्या मांसपेशीवर लावल्यास आराम मिळतो.

५. चेहऱ्यावरील त्वचा उजळविण्यासाठी

तुरटीची पूड करून त्यात थोडे गुलाबजल टाकून, त्याची दाटसर पेस्ट तयार करावी. ही पेस्ट चेहरा धुवून त्यावर लावावी. १०-१५ मिनिटे ठेवून मग चेहरा साध्या पाण्याने धुवून टाकावा. आठवड्यातून एकदा हा उपाय केल्यास तुमची त्वचा उजळलेली दिसेल. शिवाय चेहऱ्यावर वांग किंवा डागाची समस्या असल्यास ते देखील या वापराने दूर होतात

६. नितळ पायांसाठी

बऱ्याच जणांचे पाय काळवंडलेले आणि त्यावरील त्वचा फाटलेली असते. अशावेळी कोमट पाण्यात तुरटी फिरवून त्या पाण्यात १५ ते २० मिनिटे पाय बुडवून ठेवल्यास पायांच्या त्वचेमध्ये चांगलाच फरक झालेला दिसून येतो. आता इतके सारे वाचल्यानंतर या स्वस्त अशा तुरटीचे किती फायदे आहेत, हे तुमच्या लक्षात आलेच असेल. फक्त एक गोष्ट लक्षात घ्या की, तुरटीचा वापर हा माफक प्रमाणात असावा. रोजच्या रोज तुरटीचा वापर केल्यास तो आरोग्याच्या दृष्टीने नुकसानदायी ठरू शकतो.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

हे एकाच व्यक्तीत एकत्रित असणे अवघड असते. क्रिया किंवा शब्दांनी या दोनच प्रकाराने त्याचे मनातील क्रोध द्वेष कळतो. मनातील स्नेह कळायचा तर भाषणातील माधुर्य पहावे. शब्द साच असावे, मृदु, मावळ बोलणे असावे.बोलणे स्वर मध्यम असावे. शब्द रचना छोटी असावी.वाक्य ऐकल्या बरोबर त्याचा अर्थ प्रस्फ ुटीत व्हावा. राम हे बोलणे तू पहा असे लक्ष्मणास सांगू लागले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

माऊली असेच गोड बोलत.माणसाच्या जीवनात बिघाड होतो व सुधार होतो ते बोलण्याने घडू शकते्

दंत काही जीभ को हम ३२ तू अकेली.एक बार हम चबा तो तेरी हालत क्या होय?

जीभ कहें अगर मै टेडी चलू तो तुम ३२ एकसाथ गीर जाए.

राम म्हणे याच्या भाषे वरून उच्चारावरून हा विद्वान, वेद विद्येचा जाणकार दिसतो.त्या वीणा असे भाषेवर प्रभुत्व अन्यत्र दिसत नाही.

शब्दांच्या उच्चाराचे सुद्धा एक शास्त्र आहे.हनुमानाने व्याकरणाचा खूप अभ्यास केलेला असला पाहिजे. तो बोलताना त्याची देहबोली अगदी सुयोग्य होती.हनुमानाचे किती सूक्ष्म निरीक्षण प्रभू करीत होते.. आपल्याला काय बोलायचे ते आपल्याला आधी स्पष्ट माहिती पाहिजे. हा थोडाच बोलला पण त्याचे व त्याचे मालक विषयीचे स्पष्ट चित्र आपल्या मनात याने उभे केले. याची वाणी ह्रदयातून बाहेर पडते.याच्या सारखे बोलावे. याचा तू अभ्यास कर.असा दूत उत्तम असतो.

**(क्रमशः)**

## फुलमाला....



कृष्ण कमळ....

कौरव पांडव ही म्हणती फुलाला
या फुलाचे रूप पवित्र सोज्वळ
विविध रंगांमध्ये हे फुल फुलते
मनमोहक दिसते हे कृष्ण कमळ

दिवसभर जरी दिसे सुकुमार
सायंकाळी फुल हे सुकते
मंद दरवळ पसरता चोहीकडे
भवतालात मात्र ते नित्य उरते


सौ. माधुरी म.इनामदार, मिरज...

# 'अरण्य'मध्ये उलगडणार जंगल, भावना आणि संघर्षाची कहाणी

ज्योतिर्मय साहित्य

एस एस स्टुडिओ निर्मित 'अरण्य' या चित्रपटाचे दमदार मोशन पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले आहे. निर्माते शरद पाटील आणि अंजली पाटील यांची निर्मिती असलेल्या या चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शक अमोल दिगांबर करंबे आहेत. हार्दिक जोशी, वीणा जगताप, हृितीका पाटील, विजय निकम, सुरेश विश्वकर्मा आणि चेतन चावडा यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचा भव्य प्रवास १९ सप्टेंबर २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



मोशन पोस्टरमध्ये जंगलाची दाट हिरवाई, धुक्याने व्यापलेले दृश्य आणि त्यात लपलेला गूढपणा अंगावर काटा आणणारा आहे. यातील हार्दिक जोशी चा लूक विशेष लक्ष वेधून घेतो. डोळ्यांमध्ये प्रखर राग आणि निर्धार, चेहरा कपड्याने झाकलेला आणि पार्श्वभूमीला जंगलातील गूढ वातावरण. त्याच्या नजरेतून एक भयंकर




संघर्ष आणि दडलेली कहाणी जाणवते.

दिग्दर्शक अमोल दिगांबर करंबे म्हणतात, 'अरण्य' ही फक्त जंगलाची कथा नाही, तर ही मानवी अस्तित्व, निसर्गाशी असलेलं आपलं नातं आणि संघर्षाच्या काठावर उभ्या राहिलेल्या माणसाची कहाणी आहे. या अरण्यात फक्त झाडं, पाने किंवा वेली नाहीत, तर येथे श्वास घेणाऱ्या प्रत्येक गोष्टीच्या मागे एक इतिहास आहे. कधी शांत, कधी रक्तरंजित. मला हवं होतं की प्रेक्षकांनी या जंगलाचा गंध, त्यातील ओलसरपणा, आणि त्याच्या प्रत्येक सावलीतील रहस्य अनुभवावं. 'अरण्य' प्रेक्षकांना आतून जगायला लावेल.''

निर्माते शरद पाटील म्हणतात, ''आजच्या सिनेमात तंत्रज्ञान, थरार आणि भावना यांचा सुंदर संगम दुर्मीळ झाला आहे. 'अरण्य'करताना आम्ही ठरवलं होतं की, हा चित्रपट प्रेक्षकांच्या डोळ्यासमोर उभा राहावा. तो अनुभवावा. 'अरण्य' म्हणजे निसर्गाशी असलेल्या आपल्याच नात्याचं आरशातलं प्रतिबिंब आहे. प्रत्येक फ्रेम, प्रत्येक संवाद आणि प्रत्येक भावनेतून आम्ही एक सत्य सांगत आहोत, जे दडलेलं आहे परंतु दुर्लक्षित नाही. आम्हाला खात्री आहे की, 'अरण्य' प्रेक्षकांच्या मनात खोलवर ठसा उमटवेल.''

विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### गुरुदेवांची स्वतंत्र राजकीय विचारसरणी

आपली भाषा, आपले साहित्य, आपली संस्कृती यांचा अभिमान बाळगून आणि स्वावलंबनावर भिस्त ठेवून आपण स्वतःची उन्नती करून घेतली पाहिजे. आपला गौरव आपण स्वप्रयत्नांनी वाढवला पाहिजे. मग दुसऱ्यांकडून सन्मान मागण्याची गरजच नाही असे त्यांना वाटत होते. आपण परतंत्र का झालो याचा विचार करताना त्यांना वाटत होते की आपणच आपल्या भाषा, धर्म, जाती यांच्यामध्ये भेदाच्या भिंती निर्माण केल्या. उच्चनीचतेच्या कल्पनांमध्ये अडकून राहिलो. त्यामुळे आपल्यातील एकी नष्ट होऊन आपण परतंत्र झालो. धर्म, जाती, पंथ यांचा भेद न बाळगता आपण एक व्हायला हवे. सर्वांना प्रेमाने वागवण्याची आणि नांदवण्याची भारताची उदात्त परंपरा होती. ती नष्ट होऊ देता कामा नये. आपण बाहेरून अनेक भासलो तरी आतून आम्ही सारे एकच आहोत आणि एकच राहू ही भावना सदैव जागृत राहिली पाहिजे हे त्यांचे सांगणे आजही महत्त्वाचे ठरते.

ज्या इंग्रजांनी आपल्यातील एकी नष्ट करण्यासाठी हातभार लावला त्यांनी आपल्या परिस्थितीविषयी बोलणे योग्य नाही आणि तो त्यांना अधिकारही नाही. रौलेट ॲक्टला विरोध करण्यासाठी १३ एप्रिल १९१९ मध्ये जालियनवाला बागेत भरलेल्या सभेत जनरल डायरने बेछूट गोळीबार केला आणि त्यामध्ये अनेक निष्पापांचे बळी गेले. या घटनेने गुरुदेवांना कमालीची अस्वस्थता आली आणि त्यांनी इंग्रज सरकारने दिलेली  सर ही पदवी परत केली. आणि त्यासोबतच त्यांचा निषेध करणारे एक पत्र लिहिले. या पत्रात त्यांनी इंग्रज सरकारच्या या कृत्याचा स्पष्ट निषेध करताना असे लिहिले, '' आम्हाला मिळालेल्या सन्मानाची पदके ही त्या मानसन्मानाच्या आडून अपमानाची चिन्हेच वाटतात आणि मी कितीही मोठा व ख्यातनाम असलो तरी मी माझ्या देशबांधवांबरोबर खांद्याला खांदा लावून उभा राहीन. माझ्या मूक व भयग्रस्त बांधवांच्या भावनांना वाचा फोडणे व माझा स्वतःचा निषेध नोंदवणे हे कमीत कमी मला केलेच पाहिजे. याचे परिणाम काहीही होवोत. आजच्या अपमानास्पद वागणुकीमुळे अशी मानाची बिरुदे मिरवणे हे आमच्यासाठी लाजिरवाणे आहे.

१८८६ मध्ये कलकत्त्याला राष्ट्रीय सभेचे दुसरे अधिवेशन झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी होते. त्यांनी या अधिवेशनात आपले विचार मांडताना म्हटले की आपला देश निर्धन आणि विपन्नावस्थेत येण्याचे कारण परकीय अंमल आणि त्यांची एकतंत्र राज्यपद्धती आह राजा हा प्रजेकरता असतो. प्रजाच त्याला राजत्व देत असते. राजाकरता प्रजा नसते, हे राजाने ध्यानी बाळगून वागायला हवे. गुरुदेवांच्या मनावर दादाभाई नौरोजींच्या बोलण्याचा परिणाम झाला. राजकीय दास्यापेक्षा बौद्धिक दास्य भयावह आहे. देश स्वतंत्र व्हायचा असेल तर आपल्या देशातील लोकांचे मने आणि बुद्धी निर्भय असली पाहिजे आणि त्यांची वागण्याची नैतिक पातळी त्यांच्या राज्यकर्त्यांपेक्षाही उच्च असायला हवी असे प्रतिपादन ते करू लागले.

(क्रमशः)

# प्रिया बापट पहिल्यांदाच झळकणार पोलिसाच्या भूमिकेत

ज्योतिर्मय साहित्य

मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण करणारी, अभिनयाच्या विविध छटांमध्ये रसिकांची मनं जिंकणारी प्रिया बापट आता एका नव्या आणि थरारक अविष्कारात दिसणार आहे. अमेझॉन प्राईमवर लवकरच प्रदर्शित होणाऱ्या 'अंधेरा' या हॉरर सिरीजमध्ये ती एका महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकणार आहे. नुकताच या सिरीजचा ट्रेलर सोशल मीडियावर झळकला असून, त्याने प्रेक्षकांमध्ये एकाच वेळी भीती आणि उत्सुकता निर्माण केली आहे. या सिरीजमधून प्रियाने हॉरर जॉनरमध्ये पदार्पण केले असून यात ती पहिल्यांदाच पोलिसाची भूमिका साकारत आहे. त्यामुळे तिच्या चाहत्यांसाठी ही एक आनंदाची बाब आहे.

या अनुभवाबद्दल प्रिया बापट म्हणते, मी पहिल्यांदाच हॉरर जॉनरमध्ये काम करतेय आणि हा अनुभव खरोखरच वेगळा ठरला. खूप नाईट शिफ्ट्समध्ये शूटिंग केलं, परंतु स्क्रिप्ट इतकी इंटरेस्टिंग होती की,  काम करताना काहीच जाणवले नाही. जेव्हा हे स्क्रिप्ट मला मिळालं, तेव्हा वाचून एकच विचार मनात आला, तो म्हणजे सध्या वाचलेल्या स्क्रिप्ट्सपैकी हे सर्वात उत्तम होतं. ही कथा फार वेगवेगळ्या पद्धतीने उलगडते आणि म्हणूनच ती अभिनयाच्या दृष्टीने खूपच आव्हानात्मक ठरली. यात ॲक्शन सिक्वेन्सेस आहेत, भीतीदायक हॉरर सीन आहेत. त्यामुळे कलाकार म्हणून ही भूमिका करताना एक वेगळीच मजा आली. आतापर्यंत मी राजकारणी, वकील यांसारख्या विविध भूमिका साकारल्या आहेत. मात्र, या सिरीजमध्ये मी एका पूर्णतः वेगळ्या प्रोफेशनमधून प्रेक्षकांसमोर येणार आहे. मराठीत मला जसं प्रेम मिळालं, तसंच प्रेम मला हिंदी प्रोजेक्ट्ससाठीही मिळालं, याचा खूप आनंद आहे. आता हॉरर जॉनरमधून मी प्रेक्षकांचं मन कसं जिंकू शकेन, याचीच उत्सुकता लागली आहे. ट्रेलर प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांचा प्रतिसाद बघायला मी प्रचंड उत्सुक आहे. आशा आहे, प्रेक्षक या भूमिकेलाही तितकंच प्रेम देतील.

'अंधेरा'चं ट्रेलर पाहून प्रेक्षकांमध्ये अनेक




प्रश्न निर्माण झाले आहेत. कथानक काय आहे? हे रहस्य नेमकं कुठं घेऊन जाणार आहे? मात्र या सगळ्या प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना लवकरच प्रेक्षकांना मिळणार आहेत, परंतु तोपर्यंत 'अंधेरा'ची ही थरारक झलक आणि प्रिया बापटचं हॉरर शैलीतील पदार्पण यामुळे ही सिरीज चर्चेचा विषय ठरली आहे.



## मन आणि मानसोपचार



मित्रांनो,
संतुलित आणि निरोगी जीवन जगण्यासाठी चांगले मानसिक आरोग्य असणे आवश्यक आहे. आपले मानसिक, भावनिक आणि सामाजिक कल्याण हे आपल्या मानसिक आरोग्याचा एक भाग आहे. याचा अर्थ असा की आपण दररोज कसे अनुभवतो, विचार करतो आणि कृती करतो यावर त्याचा प्रभाव पडतो. आपले मानसिक आरोग्य आपण निर्णय कसे घेतो, ताणतणावाला कसे तोंड देतो आणि लोकांशी कसे संवाद साधतो यावर परिणाम करते.
बालपण, पौगंडावस्था आणि प्रौढत्वासह प्रत्येक वयात मानसिक आरोग्य महत्वाचे आहे .

मानसिक आरोग्य हे संपूर्ण कल्याणाचा एक आवश्यक घटक आहे. भावनिकदृष्ट्या निरोगी लोक त्यांच्या भावना, कृती आणि कल्पनांवर चांगले नियंत्रण ठेवू शकतात. ते जीवनातील अडचणींना तोंड देण्यास सक्षम असतात. ते अडचणींना दृष्टिकोनातून पाहू शकतात आणि अपयशातून सावरू शकतात. त्यांना स्वतःवर आणि त्यांच्या नातेसंबंधांवर विश्वास असतो. म्हणूनच मी डॉ अमोल पाथ्रीकर (मानसोपचार आणि व्यसनमुक्ती तज्ञ) आपल्या सर्वांचे मानसिक आरोग्य राखण्यासाठी ह्या मासिकात आठवड्यातून दोन दिवस मानसिक आरोग्या वरील लेख लिहिणार आहे.

### जेव्हा असं वाटतं की सगळंच संपलंय...

नैराश्य किंवा उदासीनता (डिप्रेशन) ही मनाची उदासीन अवस्था आणि सर्वाधिक आढळणारा मानसिक आजार आहे. या आजाराने ग्रासलेल्या व्यक्तीला नेहमी उदास व निराश वाटते आणि दैनंदिन कामे तसेच आनंददायी गोष्टीतील आवड कमी होते. २० ते ३० टक्के व्यक्तींना कधीतरी हा आजार होत असतो. पौगंडावस्थेनंतर पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये हा आजार होण्याचे प्रमाण दुप्पट असते. जगात सुमारे ३२ कोटी नैराश्यग्रस्त लोक असून त्यापैकी ७ कोटी (१८ टक्के) लोक एकट्या भारतात आहेत. यातील जवळपास ८० टक्के नैराश्यग्रस्तांना कोणत्याही प्रकारचे उपचार अथवा तपासण्याची व्यवस्थाच उपलब्ध नसते. (भारत हा जगातील सर्वात नैराश्यग्रस्त देश आहे.... अलीकडील WHO सर्वेक्षणानुसार.)

■ आत्मघाती विचार आणि वर्तन : उपचार न केलेल्या नैराश्याच्या सर्वात गंभीर गुंतागुंतींपैकी एक म्हणजे आत्महत्येचा धोका. नैराश्यामुळे निराशा आणि निराशेच्या भावना उद्भवू शकतात, यामुळे आत्महत्येचे विचार किंवा प्रयत्न होऊ शकतात.

व्यसनाधिनता : नैराश्याने ग्रस्त व्यक्ती त्यांच्या लक्षणांचा सामना करण्याचा मार्ग म्हणून अल्कोहोल किंवा ड्रग्सकडे वळू शकतात, ज्यामुळे पदार्थांचा गैरवापर किंवा व्यसनाधीन समस्या उद्भवू शकतात.

पुढील उद्याच्या भागात.....

उत्कर्ष हॉस्पिटल
छत्रपती संभाजीनगर - +91 88889 92688
डॉ. अमोल म. पाथ्रीकर,
मानसोपचार आणि
व्यसनमुक्ती तज्ज्ञ



## इंदापूरी निखारे

### तो एक पोपट...




ज्योतिर्मय साहित्य

तो एक पोपट
खुप वर्षांपूर्वी चिडला...
नेहमी सगळ्यांना त्या
काऊ चिऊचेच कौतुक...
ते लेखक कवी पासून सगळ्यांनाच!
खुप वर्षांपूर्वी त्या गुरूने पण
शिष्यांची धनूर्विद्येची परीक्षा घेण्यासाठी...
मलाच बाण मारायला लावला...
तेव्हा पण त्या गुरुजींना काऊ, चिऊ दिसले नाही...
मनात राग होताच!
तसे त्याला शिट्टी वाजवीता येत होती...
मिठु मिठु बोलता येत होते...
तरीपण उपेक्षित...
तो प्रचंड चिडला...
ही माणसे पण...
कौतुक काऊचीऊंचे...
कथा, कविता त्यांच्यावर...
त्यांना अगदी मुक्तपणे भटकायला...
आणि मला मात्र पिंजऱ्यात बंदिस्त...
मग बंदिस्त पिंजऱ्यात असतांना...
त्याच्या लक्षात आले...
की ही माणसे फक्त राजाचे ऐकतात...
मग त्याने देवाला प्रसन्न न करता...
राजाला प्रसन्न केले!
आणि त्याचे आयुष्यच बदलले...
त्याने विद्रोह केला...
कायद्याने तो मुक्त झाला...
आणि राजाने त्याला
सोन्याच्या पिंजऱ्यात ठेवले...
तू खूप वेगळा आहे...
तुझ्यासारखा हुशार कोणीच नाही...
पोपट पार भारावून गेला...
आरामशीर राहू लागला...
राजाने त्याला तिखट मिरची दिली तरी...
तो आनंदाने खाऊ लागला...
उलट राजाचे कौतुक पण करायचा...
राजाला पोपट फारच आवडू लागला...
त्याची पोपटपंची तर खुपच!
मग पोपट राजा जे म्हणेल, सांगेल तेव्हढेच फक्त बोलायला लागला...
परंपरा सुरु झाली
खुप वर्षांपूर्वी...
राजा अनेक पोपटपंची करणाऱ्याना...
सोन्याचा पिंजरा देऊन बंदिस्त करू लागला!
पोपट पण शिकत आहेत...
अगदी उच्च शिक्षण घेऊन...
एखादा तरी राजा सोन्याच्या पिंजऱ्यात...
बंदिस्त करुन ठेवण्याची वाट पहात...
आता राजाला फक्त एकच काळजी असते...
त्या सोनेरी पिंजऱ्यात बंदिस्त असलेल्या पोपटांना...
राजा होण्याची स्वप्ने पडू न देण्याची...

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906



मुली व महिलांसाठी सुवर्णसंधी
कोठे नौकरी करण्यापेक्षा स्वतःचे पार्लर सुरु करा
फक्त 45 दिवसांचा कोर्स अत्यंत कमी फीस मध्ये
■ खरंच कोणाचाही विश्वास बसणार नाही पण मुली व महिला स्वावलंबी व्हाव्यात म्हणून अगदी अल्प फीस डिस्काउंट मध्ये आमच्याकडे पार्लरचा कोर्स करा व स्वतःचे पार्लर सुरु करा. ■ कमी भांडवलात पण तुम्ही तुमच्या व्यवसाय सहज सुरु करू शकता. ■ प्रॅक्टीससाठी लागणारी साधने सलोन मध्येच उपलब्ध करून दिली जातील.
बेसिक ब्युटी पार्लर कोर्स ■ १५०००/- चा कोर्स फक्त ६०००/- मध्ये
■ रजिस्टेशन फिस ५००/- ■ पहिल्या १० विद्यार्थीनींना मेकअप किट फ्रि.
■ मर्यादित प्रवेश फक्त २० विद्यार्थीनींसाठी
MAKEOVER
Professional Salon & Acadamy
संपर्क : +91 7588107454
शॉप नं.०२, गल्ली नं.११ विश्रांतीनगर, मुकुंदवाडी रेल्वेस्टेशनरोड छ. संभाजीनगर

# मास्टर दा स्वातंत्र्यसेनानी सूर्यभान (सूर्य सेन)

ज्योतिर्मय साहित्य


(मागील अंकावरून)

भारतीय चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांनी सूर्य सेन यांच्या जीवनावर आधारित खेलें हम जी जान से हा चित्रपट २०१० साली दिग्दर्शीत केला. यामध्ये अभिषेक बच्चन यांनी सेन यांची भूमिका साकारली आहे. बेदब्रता पेन दिग्दर्शीत आणखी एक चित्रपट चितगांव २०१२ साली सूर्य सेन यांच्या शस्त्रागारावरील छाप्याबद्दल होता. या चित्रपटात मनोज बाजपेयी यांनी सूर्यसेन यांची भूमिका साकारली आहे.

सूर्य सेन यांचा जन्म ब्रिटिश भारतातील (आता बांगलादेश) बंगाल प्रेसिडन्सीच्या चितगावमधील रौझान उपजिल्ह्याखालील नोआपारी येथे एका बंगाली वैद्य कुटुंबात झाला. त्यांचे वडील रामनिरंजन सेन शिक्षक होते. १९१६ मध्ये जेव्हा ते मुर्शिदाबादच्या बेरहमपुर कॉलेजमध्ये (आता कृष्णात कॉलेज) बी.ए.चे विद्यार्थी होते तेंव्हा त्यांनी त्यांचे शिक्षक शतीशचंद्र चक्रवर्ती यांच्याकडून भारतीय स्वातंत्र्यचळवळीबद्दल जाणून घेतले. १९१८ मध्ये सूर्य सेन चितगावला आले आणि त्यांनी स्थानिक राष्ट्रीय शाळेत अध्यापन करण्यास सुरवात केली. या शाळेमुळेच त्यांना मास्टर दा या सन्माननीय उपाधीने प्रसिद्धी मिळाली.

स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी त्यांनी नोकरी सोडली आणि वयाच्या २४ व्या वर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या चितगाव शाखेचे ते अध्यक्ष झाले. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी असहकार चळवळीत सक्रीय सहभाग घेतला. या चळवळीमध्ये जेंव्हा शिथीलता आली तेंव्हा १९१६ नंतर त्यांनी क्रांतीकार्यात सहभागी होण्यास सुरवात केली. शिक्षकांपासून प्रेरणा घेऊन सूर्य सेन यांनी अनुशीलन समितीमध्ये प्रवेश केला. जी शरतचंद्र बसू यांच्या नेतृत्वाखाली, काम करणाऱ्या क्रांतीकारी संघटनेतही त्यांनी काम केले. भारतातील ब्रिटीश राजवटीचा अंत करण्यासाठी हिंसाचाराच्या विचारसरणीवर बसूंचा विश्वास होता. क्रांतीकारक संघटनेबरोबर काम करीत असतानाच बंगालमध्ये असहकार चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या स्वातंत्र्यसेनानी चित्तरंजन दास यांच्याबरोबरही सूर्य सेन यांनी इंग्रजाविरुद्ध लढा दिला. असहकार चळवळीने बंगालमध्ये राष्ट्रवादाची भावना जागृत केली होती आणि अचानक महात्मा गांधी यांनी चौरीचौरा पोलीस स्टेशन हत्याकांडानंतर असहकार चळवळ मागे घेतल्याने सूर्य सेन जहाल क्रांतीकारी गटांकडे ओढले गेले. पण अहिंसक व सशस्त्र यांची समान महत्वाची गोडी हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ठ होते. युगांतर या संघटनेमध्येही त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. मानवी अधिकार स्वातंत्र्य व अन्याय्य ब्रिटीश सत्तेविरुद्ध जागरूकता वाढविणे हे सूर्य सेन यांचे मुख्य उद्दिष्ठ होते. सूर्य सेन यांनी इंडियन रिपब्लीकन आर्मी ही क्रांतीकारकांची संघटना स्थापन केली. या संघटनेत प्रचंड संख्येने युवक आणि युवतीं यांनी आपला सहभाग नोंदविला. त्यांनी चटगांव भागातील शाळांतर्गत युवकांना संघटित केले. क्रांतीकारक विचारांचा प्रसार केला व विविध ठिकाणी सशस्त्र स्थळे निर्माण केली. स्वातंत्र्याच्या आंदोलनाला चालना देण्यासाठी रोख रकमेसाठी सूर्यासेन यांनी आसाम-बंगाल रेल्वेच्या तिजोरीची लूट केली. ज्यासाठी त्यांना सहकारी क्रांतीकारी अंबिका चक्रवर्ती यांच्यासह दोन वर्षे तुरुंगवास १९२६ ते १९२८ भोगावा लागला.

१९२८ च्या अखेरीस दोघांचीही सूटका झाली आणि त्यांनी त्यांचे क्रांतीकारी कार्य पुन्हा सुरू केले. इंडियन रिपब्लीकन आर्मी च्या माध्यमातून योजनाबद्ध रीतीने ब्रिटिशांविरुद्ध मोठा लढा देण्याचे उद्दिष्ठ ठेऊन आखणी करण्यात आली.१८ एप्रिल १९३० रोजी रात्री स्वंतंत्र्यासाठी भारलेल्या तरुण-तरुणींनी क्रांतीकारक सूर्यसेन यांच्या नेतृत्वाखाली चितगाव शस्त्रागारावर स्वातंत्र्य चळवळीतील सर्वात मोठा धाडसी हल्ला केला. यतींद्रनाथ मुकर्जींच्या नंतर सूर्यसेन हेच बंगाली क्रांतीकारकांचे प्रभावशाली नेते होते. या हल्ल्यामध्ये अंबिका चकवर्ती, गणेश घोष, फणींद्र नंदी, सुरेंद्र सरखेल या प्रमुख नेत्यांसह अनेकांचा सहभाग होता. आक्रमण करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या इंडियन रिपब्लीकन पार्टी मधील या मिशनसाठी निवडलेल्या दलाचे चार विभाग केले होते. १८ एप्रिल रोजी रात्री पावणेदहा ते साडेदहा या अवधीत हे आक्रमण यशस्वी



करावयाचे ठरले. शस्त्रागाराचे महत्व व त्यावर असणारा बंदोबस्त यांचा विचार केला तर ही फार मोठी धोक्याची गोष्ट होतीच. चार विभागातील एका दलाकडे शस्त्रागार ताब्यात घेणे, दुसऱ्या दलाकडे ऑक्झिलियरी फोर्सचे शस्त्रागार ताब्यात घेणे, तिसऱ्या दलाकडे टेलिफोन एक्स्चेंज व इतर संदेशवाहक साधने नष्ट करण्याचे काम तर चौथ्या दलाकडे क्लबात जमलेल्या इंग्रजी अधिकाऱ्यांना ठार करण्याचे काम होते. पहिल्या दलाने कलकत्ता व डाक्काकडे जाणाऱ्या तारा तोडून टेलिफोनच्या यंत्रांची मोडतोड करून त्यांना आग लावून दिली. दुसऱ्या टोळीने मार्गातील रेल्वेलाइन्स उध्वस्त करून टाकल्या. त्यामुळे कित्येक मालगाड्या रुळाखाली आल्या. क्लबातील युरोपियनांची हत्या करण्याचे काम ज्या टोळीकडे होते तिला क्लबच्या जागी कोणीच ना आढळल्यामुळे ती टोळी बाकीच्या गटात समाविष्ट झाली. ऑक्झिलियरी कोर्सच्या शस्त्रागारावर आक्रमण करणाऱ्या टोळीने तेथील चार पहारेक-यांना ठार मारून सार्जंट फैरेल यांच्या मस्तकाचे तुकडे केले व शस्त्रागार उघडून अनेक रायफली, पिस्तुले, रिव्हॉल्व्हर्स, काडतुसे व एक लेविस गन ताब्यात घेऊन तेथे आग लावून दिली. पोलीस लाइनवर आक्रमण करणाऱ्या दलात खाकी गणवेश घातलेले ५० तरुण होते. त्यांनी पहारेक-यांना ठार मारून तेथील शस्त्रागार लुटले व तेथेही आग लावून दिली. ही वार्ता कळतात डि. मॅजिस्ट्रेट घटनास्थळाकडे जाऊ लागले. तोच क्रांतीकारकांनी त्यांच्या मोटारीवर हल्ला करून एका शिपायाला ठार मारले व ड्रायव्हरला भयंकर जखमी केले. त्या रात्री तेथील सर्व युरोपियन लोक इतके घाबरलेले होते की त्यांनी स्वतःला गुप्त ठिकाणी कोंडून घेतले. क्रांतीकारक सर्व ठरल्याप्रमाणे योजना फत्ते करून परत येत असता रात्री बाराच्या सुमारास फार्मर जॉन्सन इत्यादि इंग्रज अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली गुरखा पलटणीने स्वातंत्र्यसैनिकांचा पाठलाग सुरु केला. त्यांच्यावर मशिनगन्स चालविण्यात आल्या आणि या हल्ल्यास

**स्वातंत्र्यसेनानी**

**शिरीष चिटणीस**

कार्यवाह महाराष्ट्र साहित्य परिषद



क्रांतीकारकांनीही गोळीला गोळीने व मशीनगनला बॉम्बने उत्तर दिले. यामध्ये हिंमाशू सेन नावाचे क्रांतीकारक जखमी झाले व पुढे त्यांचे निधन झाले. सशस्त्री क्रांतीकारक यशस्वीपणे सेनेशी टक्कर देत शहराबाहेरच्या पर्वतावर गुप्त झाले. सेनेने पर्वताला वेढा दिला आणि कित्येक तास चाललेल्या युध्दात ५० इंग्रजांकडील सैनिक मरण पावल्याने इंग्रज सेनेने पळ काढला. दुसऱ्या दिवशी तिप्पट सेना घेऊन इंग्रज सैनिकांने आक्रमण केले त्यात तीस सैनिकांना यमसदनी पाठविण्यात क्रांतिकारकांनी यश मिळवले. यामध्ये १९ क्रांतीकारक ठार झाले. हरि गोपाल बाल, प्रवासनाथ बाल, अर्धेदुविकास दस्तीचार, जतींद्रनाथ गुप्त, मधुसूदन दत्त, पुलीन विकास घोष, नरेश राय, त्रिपूल सेन, बिशन भट्टाचार्य यांचा यात समावेश होता. हा संघर्ष २२ एप्रिल, २३ एप्रिल पुन्हा ६ मे १९३०, २ सप्टेंबर १९३० असा बरेच दिवस चालू होता. जिकडे तिकडे सशस्त्र सेना व धरपकड करण्यात आली. तरीही स्वातंत्र्यसेनेतील सैनिकांनी पोलीस इन्स्पेक्टर हसातुल्ला याला गोळी मारून ठार मारत तसेच पोस्ट ऑफिसवर यशस्वी दरोडा घालीत संघर्ष चालूच राहणार याची इंग्रज सत्तेला भिती निर्माण करून दिली. चितागाँग शस्त्रागार अभियोग बरेच महिने चालला त्याचा निर्णय १ मार्च १९३२ रोजी लागला. या निर्णयानुसार अनंत सिंह, गणेश घोष, लोकनाथ बाल, आनंद गुप्त, फणींद्र नंदी, सुबोध चौधरी, सहाय रामदास, फकीर सेन, लाल मोहन सेन, सुखेंद्र दम्मीदार, सुबोध रॉय व रणधीर दास गुप्त यांना जन्मठेप व काळ्या पाण्याची शिक्षा तसेच अनिलबंधु दास व नंदा सिंह यांना तीन वर्षाची सजा झाली. उर्वरीत १९ जणांना पुराव्याच्या आधारे सोडून देण्यात आले. हा सिलसिला पुढे चालूच राहिला. या लढ्यात पुढील काळात इंग्रजी अधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात हत्या करण्यात आली. इंग्रज शासनाने मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्यसैनिकांना अटक करून हिजली कॅपमध्ये त्यांच्यावर प्रचंड अमानुष अत्याचार करण्यात आले.

इंग्रजसरकारने १८ बंगाली तरुणांना पकडून हिजलीच्या तुरूंगात डांबून ठेवले आणि खटला न चालविताच १६ सप्टेंबर १९३१ रोजी त्यांच्यावर तुरूंगात भयानक गोळीबार केला. गोळीबार अर्धा तास चालू होता व १०० वेळा फायर करण्यात आले. सुभाषचंद्र बोस यांनी आपल्या वृत्तपत्रीय निवेदनात असे म्हटले कि, ताबडतोब या घटनेची विशेष चौकशी झाली पाहिजे. नेताजी सुभाषचंद्र बोस चौकशीसाठी जात असता ११ नोव्हेंबर १९३१ रोजी त्यांना अटक करण्यात आली तेव्हा नेताजींनी ''चितागांग व हिजली विसरू नका असा बंगाली नागरीकांना संदेश दिला. १६ मे १९३३ रोजी सुर्यसेन यांना अटक होईपर्यंत जहाल स्वातंत्र्यसैनिकांच्या हल्ल्याने इंग्रज सरकार गर्भगळीत झाले.

हा सशस्त्र लढा १९३५ पर्यंत चालूच होता. सूर्य सेन हे ब्रिटीश भारतातील स्वातंत्र्यलढ्यातील अग्रगणी असणारे व इंग्रजांची गाळण उडविणारे नांव. पी ढाका विद्यापीठ आणि चितगाव विद्यापीठात निवासी सभागृहांना त्यांचे नाव देण्यात आले आहे. भारतीय इतिहासातच नव्हे तर जगाच्या इतिहासात सूर्य सेन हे नाव दुमदुमत राहिले आहे. जगातील स्वातंत्र्यलढ्यातील सर्वांना प्रेरणादायी कर्तृत्व त्यांचे आहे.

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

ज्योतिर्मय साहित्य

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची उद्या म्हणजे १२ ऑगस्ट रोजी जयंती. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप



महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई

**श्याम ठाणेदार**
**पुणे**

यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे आर्यभट्ट हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

***

# सर्जिकल स्ट्राईक

ज्योतिर्मय साहित्य

वार-गुरूवार, २८ फेब्रुवारी २०१९, संध्याकाळी देशभरात एकच बातमी झळकत होती ''सर्जिकल स्ट्राईक.'' विंग कमांडर अभिनंदन वर्धमान पाकिस्तानच्या ताब्यात गेलेत, ही बातमी देशवासीयांना अस्वस्थ करत होती. त्याच दिवशी माझ्या वैयक्तिक आयुष्यात एक छोटीशी पण मला हादरवून टाकणारी घटना घडली. संध्याकाळी ६.३० वाजता मोबाईलवर शाळेचा मेसेज आला

''स्कूल बस डिपार्टस राईट नाऊ फ्रॉम स्कूल कॅम्पस ''

हा मेसेज म्हणजे एक सिग्नलच असतो की आता थोड्याच वेळात माझा ''वाघ'' माझं साडेसहा वर्षांचं बाळ ''आई, भूक लागलीय!'' असं ओरडत घरात धडकणार याचा. मी रोजच्या सवयीप्रमाणे ६.५० ला अंगणात उभी होते. पण वेळ निघून गेली

६.५५ ७.०० ७.१० घड्याळाला मेरेथॉन जिंकायचीच होती. पण बस काही येईना. कालचक्र थांबल्यासारखं वाटू लागलं. मनात नाना शंकाकुशंकांनी गर्दी केली. बसच्या ड्रायव्हर काकांना आता फोन करून उपयोग नाही, हे माहीत होतं. मग शाळेच्या मुख्याध्यापिकांना फोन केला त्यांनी सांगितले की बसेस वेळेतच बाहेर पडलेल्या आहेत इथून. मग दूरदूरच्या पालकांना फोन केला, कोणीच ठाम माहिती देऊ शकत नव्हतं. इतक्यात शाळेतून फोन आला.

''एक बस बंद पडलीय. त्यामुळे दोन बसची मुलं एकत्र घेतली आहेत. उशीर होईल.'' मला जरा दिलासा मिळाला. पण मन? आईचं मन, ते काही ऐकायला तयार नव्हतं. ७.३५ झाले. अजूनही बस नाही. काळजी आता थेट असहायतेच्या टप्प्यावर येऊन पोहोचली. शेवटी ७.४५ ला बसचालकाचा फोन आला. ''नाक्यावर या कृष्णाला घ्यायला . इतक्या आतल्या बाजूला तुमच्या कॉलनीत येऊ शकणार नाही कारण उशीर झालाय. गाडी घेऊन मी धावले. पाचशे-सहाशे मीटरचं अंतर सुसाट पार केलं. नाक्यावर गर्दी होती. वाहनं, लोक, हेडलाइट्स सगळं होतं जसेच्या तसे. पण त्यात माझा कृष्णा नव्हता, त्याची बसही नव्हती. क्षण क्षण अगदी युगासारखा भासत होता. घशाला कोरड पडली होती. हात थरथरत होते, चेहरा घामाघूम झाला होता. डोळे शोधत होते एकच चेहरा. आणि तेवढ्यात ८.०७ मिनीटांनी बस आली.

''बाय बाय फरहान बाय दीदी बाय काका'' असं ओरडत माझा कृष्णा खाली उतरला. तो क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय अनुभव देणारा ठरला. जणू पायी वारी पूर्ण करून मला विठोबाचं दर्शन झालं होतं. भर रस्त्यात मी त्याला घट्ट मिठी मारली. माझा जीव परत आला होता. पण मित्रहो ,गोष्ट इथे संपली नाही.





सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

१ मार्च २०१९, शुक्रवार वेळ रात्रीची. साधारण ९.२० ची.

टीव्हीसमोर आम्ही तिघं कृष्णा, त्याचे बाबा, आणि मी. कुणीही बोलत नव्हतं. कृष्णा पेंगुळला होता. मनात कालच्या घटनेचे धुसर पडसाद होतेच ९.२५ ला कृष्णा अचानक उठला. आणि तो माझ्याजवळ आला. त्याच्या दोन्ही तर्जनी त्याच्या नाक आणि ओठांच्या मध्ये ठेवत म्हणाला, ''आई, मीही अश्शाच मिश्या ठेवणार!'' विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांच्या मिशांसारखीच. माझा मुलगा त्या मिशांमध्ये 'हिरो' पाहत होता. देशासाठी झुंजणारा एक सैनिक. आणि मी? त्यानं बोटांच्या मदतीने दाखवलेल्या मिशांमध्ये एका आईची काळजी, एका पत्नीची अस्वस्थता आणि माझ्या मुलाचं धाडसी बालपण मी पाहत होते. रडवेली झाले होते मी. काळीज तुटत होतं. असं का? हा प्रश्न आता मलाच पडला होता. मी अर्धा पाऊण तास उशिरा आलेल्या बसमुळे हादरुन गेले होते. ज्यांना त्यांच्या लेकरांना भेटण्यासाठी महिनो न् महिने वाट बघावी लागते, फक्त पत्राद्वारे, फोनद्वारे ज्यांना आपल्या मुलांची ख्यालीखुशाली समजते आणि ज्यांची लेकरं सदैव मृत्युला सामोरं जात असतात, त्यांच्या मनाची अवस्था काय होत असेल? आपण म्हणतो, ''सीमेवर जवान झुंजतो'' पण त्या झुंजण्यात केवळ गोळ्या झेलणं नसतं. तर प्रत्येक झुंजणाऱ्या जवानामागे त्याचे आई, वडील, बायको, मूल, बहीण आणि स्नेह्यांचे त्यांच्यामध्ये अडकलेले जीव. त्या प्रत्येकासाठी प्रत्येक दिवस हा अस्वस्थतेचा दिवस असतो. प्रत्येक रात्री ''आपल्या काळजाचा तुकडा सदैव सुखरूप राहो'' त्यासाठी त्यांना मनाशी प्रार्थना करावी लागते. त्या दिवशी कृष्णानं मिशांचा आकार मला दाखवला, त्याला विंग कमांडर अभिनंदन वर्धमान व्हायचं होतं आणि माझ्या काळजात कळ उठली होती आणि मला प्रश्न पडला होता . केवळ घरात बसून टीव्हीवर बातम्या बघून त्याला स्फुरण चढले असेल का? देशासाठी लढण्याचा विचार या बालमनात आला असेल का?आणि असा विचार त्याच्या मनात का आला असेल? तेव्हा मला उत्तर मिळालं. शाळा. तो तेव्हा दिवसभराच्या सैनिकी शाळेचा विद्यार्थी होता. शाळा म्हणजे केवळ पुस्तकांचं आणि परीक्षांचं केंद्र नसतं, ती संस्कारांची पहिली शाळा असते. तिथेच राष्ट्रप्रेमाची बीजं पेरली जातात. प्रार्थनेतील ''वन्दे मातरम्'' असो किंवा अन्य देशभक्तीपर गीतं असोत, ते शब्द केवळ गाणी नसतात, तर विद्यार्थ्यांच्या अंतर्मनात बदल घडवून आणणारे ते शब्द असतात. राष्ट्रप्रेम शालेय जीवनातच विद्यार्थ्यांच्या मनात रूजतं.

(क्रमशः)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559